दुरध्वनी - ०२२-२२६२११६९, फॅक्स - ०२२-२२६२०७२१
ई मेल
cp.mum.dcp.sb2.cid@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

पुण्यश्लोक 300

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**
**अपर पोलीस आयुक्त कार्यालय, वि.शा.२, गु.अ.वि., मुंबई**
अॅनेक्स-२ इमारत, बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग, मुंबई-४००००१

जा.क्र.: ४०९ / विशा—२ / अपोआ / गुअवि / २०२५ दिनांक: ०२ / १२ / २०२५.

प्रती,

हॉटेल आणि रेस्टॉरन्ट असोसीएशन,
फ्लॅट नं. ४, कॅन्डी हाऊस, पहीला मजला,
मंडलीक रोड, कुलाबा, मुंबई—४०० ००१.

**विषय**: नवीन Immigration and Foreigners Act, 2025 संबंधित फॉर्म "C" (फॉर्म—III) प्रशिक्षणाबाबत.

उपरोक्त विषयास अनूसरून आपणांस कळविण्यात येते की परदेशी नागरिक यांची नोंदणी आणि व्हीसा सेवा यासंबंधात Immigration and Foreigners Act, 2025 कायदा दि. ०१ सप्टेंबर २०२५ पासुन लागु करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०८/१२/२०२५ रोजी फॉर्म "C" (फॉर्म—III) प्रशिक्षणाकरीता सर्व पोलीस ठाण्याचे परदेशी नागरीक नोंदणी संबंधीत काम करणारे (ATC) अधिकारी/अंमलदार तसेच मुंबईतील परदेशी नागरिकांची राहण्याची सोय कारणारे हॉटेल/गेस्टहाऊस व्यावसायीक व कर्मचारी यांचेकरीता सकाळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत कार्यशाळा नायगांव पोलीस हॉल, नायगाव, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदरचे प्रशिक्षण परदेशी नागरिक नवीन Immigration and Foreigners Act, 2025 संबंधित फॉर्म "C" (फॉर्म—III) नोंदणी आणि अहवाल देण्याशी संबंधित आहे. फॉर्म "C" चे नांव बदलण्यात आले असून नवीन नांव Form-III करण्यात आले आहे. तसेच सदरचा Form-III हा OCI कार्ड धारक यानाही भरणे बंधनकारक आहे. तसेच उपरोक्त कायद्यान्वये कलम २३(ब) अंतर्गत सदर नियमाचे उलंघन केल्यास रुपये ५०,०००/—एवढा दंड किंवा ०३ वर्षापर्यंत कारावास किंवा ०३ लाखापर्यंत दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होतील.

तरी सदर प्रशिक्षणाकरीता आपले संघटनेशी सलग्न असलेले परदेशी नागरिकांची राहण्याची सोय कारणारे सर्व हॉटेल/गेस्टहाऊस व्यावसायीक तसेच संबधीत कर्मचारी यांना सदर कार्यशाळेकरीता उपस्थित राहणे अनिवार्य असलेबाबत सूचना देण्यात यावी ही विनंती.

(नियती ठाकर दवे)
अपर पोलीस आयुक्त,
विशेष शाखा—२, गु.अ.वि.,
मुंबई.